

# सांस्कृतिक जागरण परिषद–नागपूर.



श्रीगुरुदेव सेवाश्रम, सुभाषनगर, नागपूर.

दि.११../१२/२०१३

समस्त मा. पत्रकार बंधू!

संत तुकाराम महाराजांची ध्यानचिंतन तपोभूमी भूमाफीयांच्या घश्यातून वाचविण्यासाठी सांस्कृतिक जागरण परिषद दि.   /१२/२०१३ तर्फे प्रसारणार्थ

श्रीक्षेत्र :– भामचंद्र आणि भंडारा डोंगर या संत तुकाराम महाराजांच्या ध्यानचिंतन तपोभूमीवर बड्या कंत्राटदार, भूमाफीयांनी सन् २००७ पासून विकासाच्या नावाने अतिक्रमन करुन धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे भामचंद्र व भंडारा डोंगर हे सांस्कृतिक स्थळ उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यासाठी **'संतभूमी संरक्षक संघर्ष समिती'** श्री मधूसुदन पाटील महाराज यांच्या नेतृत्वात सतत लढा देत आहे. शासनाला साकड घालून वारंवार अर्ज विनंत्या करुन न्याय मागत आहे.

परिणामी ऑक्टो–नोव्हे २०११ च्या शासन निर्णयानुसार हे डोंगर जगद्गुरु संत तुकारामांचे **'राज्य संरक्षित स्मारक'** म्हणून पुरातत्त्व विभागाने अधिसूचना काढून न्याय दिला होता. मात्र आजपर्यंत त्याबाबत राज्यसरकारने कोणताच लेखी अधिहुकूम कंत्राटदार व भूमाफियां यांचे विरोधात काढला नाही; कारवायी सुद्धा केली जात नाही. त्यामुळे पुरातत्त्व विभागाने घोषित केलेल्या डोंगरांच्या संरक्षित क्षेत्रात अतिक्रमण चालूच आहे.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे! वनचरे....।।' हा पर्यावरण रक्षण व जैव विविधता जतन करणारा मुलमंत्र तुकोबांच्या ज्या भंडारा व भामचंद्र डोंगर या सांस्कृतिक तपोभूमीतून प्रगट झाला तिचे संरक्षण करण्याची जबाबदारी ज्ञानोबा तुकाराम यांचा जयघोष करणाऱ्याबरोबर तमाम सांस्कृतिकहित, संतपरंपरा व पर्यावरण जोपासणाऱ्यांचीही आहेच.

सन् २००७ पासून 'संतभूमी संरक्षक संघर्ष समिती' तपोभूमी रक्षणार्थ व्यापक स्वरुपात कार्यरत असतांना त्यामध्ये अ.भा.श्रीगुरुदेव सेवामंडळ, वैष्णव वारकरी तथा पारमार्थिक विचारवंत, सामाजिक कार्य क्षेत्रातील विविध जनसमुदाय सहभागी होत आहेत. कारण शासनाची विकासाच्या नावावर सांस्कृतिक विरोधी धोरणे व पर्यावरणाचा नाश करणारी, बांधकाम उद्योग यंत्रणा प्रचंड प्रदुषणाकडे नेत आहेच त्यामुळे जनमानसांना ती मारक ठरत आहे.

आज शासनाला भानावर आणण्याचा काम भंडारा व भामचंद्र डोंगर या पुण्यक्षेत्रांच्या रक्षणानिमित्ताने शांतीच्या मार्गाने आम्ही अवलंबणार आहोत. कारण शासनाला शासन करण्याचा अधिकार लोकशाहीने दिला आहेच त्याची अमंलबजावणी शासनाला जाब विचारण्यासाठी क्रांतीकारक का होईना! तुकोबांच्या शब्दांत **'भले तरी देवू गांडीची लंगोटी। नाठाळाचे माथी हानू काठी।।'** यास्तरावर आंदोलन उभारणी प्रसंगी केल्या जाईल अशी प्रसंगोचितवाणी **सांस्कृतिक जागरण परिषदेच्या** वतिने कर्मयोगी श्री मधुसूदन पाटील करीत आहे.

लोकशाहीत संविधानाने प्रसार माध्यमांना चौथा स्तंभ म्हणून जनकल्याणाचा, सांस्कृतिक हित जोपासण्याचा ठरविला आहे. त्यामुळे शासनाला वेळोवेळी भानावर आणण्याची खबरदारी जनतेच्या आदेशाने आपण पार पाडीत आहातच. **'संत तुकाराम महाराजांचे राज्य संरक्षित स्मारक'** अबाधीत ठेवण्यासाठी नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये दि११/१२/२०१३ रोजी सांस्कृतिक जागरण परिषदेमार्फत मा.नामदार मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करणार आहे. कृपया आपण तेही प्रसारित करावे.

आभार!

आपले नम्र

ॐमधुसूदन.

हरिभाऊ ए. वेरुळकर     अध्यक्ष– सांस्कृतिक जागरण परिषद

नागपूर.

सोबत :–

✓ आमदारांना आवाहन पत्र

✓ व मुख्यमंत्र्यांना देण्यात येणारे निवेदन जोडत आहो.

भामचंद्र डोंगर
सन - २०१४

प्रति, ------------------

-------------------------

समाज जीवानात समानता आणण्यासाठी ज्या संतांनी आपले जीवन खर्ची घातले, त्यांच्या भूमिचे आणि भुमीकेचे रक्षण करणारे नेतेच आतां या भूमिचे आणि भुमीकांचे लचके तोडताना दिसत आहेत. याचे उदाहरण म्हणजे जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची तपोभूमी भामचंद्र व भंडारा डोंगर यांचा विध्वंस थांबविणा-या पुरातत्त्व खात्याच्या संरक्षणाविषयीच्या अधिसूचनेला खिंळखिळे करण्याचा प्रयत्न करणारे स्थानिक नेतृत्व होय.

वास्तविक हें दोन्ही डोंगर ज्या गावांच्या व तालुक्याच्या हद्दीत येतात त्या गावांच्या सरपंचानी व तालुक्याच्या आमदारांनी संत तुकोबांचे पाईक या नात्याने परिसरातील लोकांची समजुत घालून व विधान सभेत आवाज उठवून या भागाचे संरक्षणासाठी व विकासासाठी पुढाकार घ्यायला हवा होता. परंतु हे पुढारीच स्वार्थाने आंधळे होऊन आज स्थानिक शेतक-यांच्या हिताचा कांगावा करीत, या जमीनी बिल्डरांच्या घशात घालून पैसे कमावण्याचे मार्ग अवलबिंत आहेत. म्हणून यांना संतभूमिच्या आरक्षण वा संरक्षण विषयक धोरणात रस नाही हे पदोपदी जाणवत आहे.

या डोंगरांचे आरक्षण आणि सभोवतालच्या प्रदेशाचे संरक्षण करुन स्थानिक भूमिचा व संतांचा महिमा राखण्या ऐवजी खेड आणि मावळचे आमदार विधान सभेत विरोधी भूमिका बजावित आहेत. याचे आम्हाला सखेद आश्चर्य वाटते पुरातत्त्व खात्याने राज्य संरक्षित स्मारकांची काढलेली अधिसूचना हे कांही त्या भूभागाचे आरक्षण नव्हते, तर हा भूभाग बिल्डरांच्या घशात न जाता तेथे सीमेंटच्या जंगला ऐवजी शेतक-यांच्या मालकीची वनउद्याने साकारणार होती आणि यातून संतभूमिचे सौंदर्य खुलून पावित्र्यही अबाधित राखले जाणार होते. शिवाय शेतक-यांचे भले होणार होते, मात्र यात पुढा-यांचे खिसे भरणार नाहीत, म्हणून त्यांनी या भूमिबरोबर अधिसूसनेलाही सुरुंग लावण्याचा प्रयत्न चालविला आहे.

परंतु आम्ही हा प्रयत्न कधीही सफल होऊ देणार नाही, त्याच प्रमाणे जगद्गरु संत तुकोबांच्या भूमिचा विध्वंसही होऊ देणार नाही. हे या तथाकथित नेत्यांना माहित आहे म्हणूनच त्यांनी सत्तेचा दुरुपयोग करुन वेळोवेळी खोटया केसेस भरुन आम्हा आंदोलकांना कायदयाने गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न अवलंबलेला आहे. याचाच भाग म्हणून अलिकडच्या काळात तळेगाव येथे स्वत: मी तसेच ह.भ.प. गजानान महाराज, बुरघाटे महाराज, नितिन महाराज काकडे, ॲड. नंदकुमार काळोखे, राजुनाना मुरे, संतोष पापळ, पांडूरंग मावळे, आदिंवर शांततापूर्ण मार्गाने अंदोलन करीत असतानाही खोटया केसेस दाखल करुन अटक केले.

या भ्याड वृत्तीचा निषेध करुन आम्ही या तथाकथित नेत्याना व त्यांच्या पाठीराख्या शासनाला सांगू इच्छितो कीं कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा राहात नाही. या न्यायाने आम्ही आमचे इच्छित ध्येय म्हणजेच संतभूमिंचे रक्षण करण्यावाचून स्वस्थ बसणार नाही. भामचंद्र डोंगर व भंडारा डोंगर हे संत तुकोबांच्या आचार-विचाराचे मेरुदंड असून ते मावळ आणि खेड तालुक्याचे माणबिंदु आहेत. तेंव्हा आम्ही या दोन तालुक्यातील आणि उर्वरीत महाराष्ट्रातील आमजनतेला साद घालून हा लढा आधिक तीव्रतेने लढणार आहोत. हे आवर्जून सांगू इच्छितो,

यात जगद्गुरु संत तुकोबांच्या उत्तरदायीत्त्वा व्यतिरीक्त आमचा कोणताही स्वार्थ नाही, तरी तुकोबांप्रति उत्तरदायीत्त्व असलेल्या सर्व भाविकांनी व वारकरी जनांनी या लढयात सहभागी होऊन उपकृत व्हावे ही कळकळीची विनंती आहे.

आपला
हरिभक्त, मधुसूदन महाराज
संतभूमि संरक्षक संघर्ष समिति